*निरोप समारंभ* कार्यक्रम

*दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या मानखुर्द येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात व्दितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थींचा मान्यवरांच्या उपस्थितीत निरोप समारंभ संपन्न* दि.१७ जुलै रोजी संस्थेच्या मानखुर्द येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थींच्या निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री.वाघसर, माजी प्राचार्य (मुलुंड आयटीआय) ,मा.श्री.नीरजपंडित (पत्रकार म.टा वृत्तपत्र तथा करियर मार्गदर्शक), मा.श्री.परब (बीएआरसी, तंत्रज्ञ), मा.श्री.महाजन (बीएआरसी, तंत्रज्ञ तथा आयटीआय, माजी विद्यार्थी) हि मान्यवर मंडळी उपस्थित होती, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे मुख्याधिकारी- मा. श्री प्रवीण भावसार यांनी भूषविले. या प्रशिक्षण केंद्रात फिटर, वायरमन व इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिकल हे अभ्यास वर्ग चालतात. सन 2016 मध्ये प्रवेशित झालेले प्रशिक्षणार्थी या वर्षी अभ्यासवर्ग पूर्ण करून बाहेर पडत आहेत म्हणूनच त्यांना निरोप देण्यासाठी व शुभेच्छा देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी शुभेच्छा देताना आपल्यातील कला-कौशल्याचा उपयोग स्वावलंबी होण्यासाठी करा तसेच समाज हितासाठी व देश हितासाठी करा असा संदेश दिला. या तंत्रज्ञानाच्या युगात रोजगाराच्या भरपूर संधी आहेत मात्र याबाबत तुम्ही जागृक राहिले पाहिजे तसेच केवळ मोबदला हे उद्दिष्ट न ठेवता ज्ञानाचे उपयोजन ज्या ठिकाणी योग्यरित्या होईल असे क्षेत्र निवडा असा सूचक सल्लाहि मान्यवरांनी दिला. अतिशय सुंदर, भव्य आणि प्रशिक्षणासाठी अनुकूल अशीही जागा आहे त्यामुळे सर्वांनी याचा सदुपयोग करत यशस्वी व्हा अशा शब्दात मुख्याधिकारी मा.श्री भावसार साहेब यांनी शुभेच्छा दिल्या. औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य मा.श्री. स्वप्नील घाटे यांनी प्रशिक्षणार्थींना स्वतःचे आयुष्य उज्ज्वल करा त्यासोबत या आयटिआयचा लौकिक वाढला पाहिजे अशी कामगिरी करा, भविष्यात कोणतीही अडचण आल्यास मदतीसाठी आम्ही आहोत असा विश्वास देत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम.जाधव मॅडम यांनी केले तर श्री.,जगताप सर, श्री.जाधव सर, श्री वडालकर सर यांनी तसेच माजी. विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले. सर्व प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण केंद्रातील गुरुजनांना वंदन करत कार्यक्रमाचा समारोप केला.


2018-7-17 12:32


2018-7-17 12:17

